# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००३२५३

**अपिलार्थी श्री. दिनेशसिंग विठ्ठलसिंग शितल**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (क- कार्यासन )**
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, चौथा मजला,
सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी**
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, चौथा मजला,
सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २१.०४.२०२५</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०९.०४.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २७.०७.२०२३ | ११.०८.२०२३/१०.१०.२०२३ | ०६.०९.२०२३ | १०.१०.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २०.१०.२०२३ रोजीच्या अर्जान्वये योग्य माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ११.०८.२०२३ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १०.१०.२०२३ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २७.०७.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती: मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ, पुणे यांनी दि. ११.०२.२०१९ रोजी पारित आदेशाप्रमाणे डॉ. राजाराम पोवार व डॉ. सुनिल घाटे, तत्कालिन अधिष्ठाता यांच्या विभागीय चौकशीच्या दोषारोप पत्रात दि.२४.११.२०१६ च्या माहिती अर्जातील "श्री.एस.एम. वाळकीकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी (चौकशी अधिकारी) मुंबई यांचा अहवाल स्वीकारुन त्यानुसार अनुकंपातत्वाखाली वर्ग-३ ची नोकरी मिळणे आणि माहिती अधिकार अधिनियम, २००५ खाली व इतर स्त्रोताव्दारे माहिती वरुन या" ओळी नव्याने दोषारोप पत्रात नमुद करुन सुधारणा केलेली व दुरुस्ती प्रस्ताव आणि संचालनालय स्तरावर योग्य ती चौकशी करुन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह तात्काळ प्रस्ताव शासनास सादर केलेली प्रतची मागणी केली होती.

..२/-

जन माहिती अधिकारी यांनी दि. ११.०८.२०२३ रोजी अपिलार्थींना कळविले की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागितलेल्या माहितीबाबत संचालनालय स्तरावर कार्यवाही सुरु आहे यथाअवकाश आपणास त्याबाबत अवगत करण्यात येईल. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.०६.०९.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.१०.२०२३ रोजी जर मुळ अर्जातील अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असेल तर जन माहिती अधिकारी यांनी त्याची प्रत अर्जदारास ७ दिवसांत उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेशित केले. जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार दि. १०.१०.२०२३ रोजी अपिलार्थींना कळविले की, शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला नसल्याने त्याची प्रत उपलब्ध करुन देता येणार नाही.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे लेखी निवेदन दि. २१.०४.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुषंगाने अपिलार्थींना कळविण्यात आले की, शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला नसल्याने त्याची प्रत उपलब्ध करुन देता येणार नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

22-4-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २२.०४.२०२५**